| MHBI140015812024 | |
|---|---|
| | दाखल दिनांक : १० / ०९ / २०२४<br>नोंदणी दिनांक : १० / ०९ / २०२४<br>निकाल दिनांक : १२ / ०५ / २०२६<br>कालावधी : व. ०१ म. ०८ दिवस ०२ |

**भाग 'अ'**

**आष्टी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.३)**
**ता.आष्टी, जि.बीड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : महेश आर. बडाख)**
(न्यायनिर्णय : दिनांक १२/०५/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र.२३०/२०२४** **निशाणी क्र.८६/ब.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : ५२४/२०२३
पोलीस ठाणे : आष्टी, ता.आष्टी, जि.बीड.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे आष्टी,<br>ता.आष्टी, जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | **श्री.व्ही.एम.दारूणकर** |
| **आरोपी** | १. **राजेंद्र पन्हालाल मदने,**<br>वय : ३६ वर्षे, धंदा : शेती, |
| | २. **वंदना राजेंद्र मदने,**<br>वय : २२ वर्षे, धंदा : शेती, |
| | ३. **पन्हालाल बाबु मदने,**<br>वय : ६२ वर्षे, धंदा : शेती, |
| | ४. **मंदाबाई पन्हालाल मदने,**<br>वय : ६० वर्षे, धंदा : शेती, |

| | |
|---|---|
| | **५. विलास सोनाजी मदने,**<br>वय : २४ वर्षे, धंदा : शेती, |
| | **६. शांतीलाल सोनाजी मदने,**<br>वय : २६ वर्षे, धंदा : शेती,<br>सर्व रा.मदने वस्ती, शिराळ, ता.आष्टी, जि.बीड. |
| आरोपींचे विधीज्ञ | **श्री.व्ही.एच. शेकडे.** |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३/१२/२०२३ |
| प्रथम खबर अहवाल | ०३/१२/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १०/०९/२०२४ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | २६/०३/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०५/०२/२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | १२/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा कालावधी लागु असल्यास | --- |

**आरोपींचा तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजेंद्र पन्हालाल मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| २ | वंदना राजेंद्र मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पन्हालाल बाबु मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ४ | मंदाबाई पन्हालाल मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ५ | विलास सोनाजी मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ६ | शांतीलाल सोनाजी मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

## भाग 'क'

## अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १) | रुपाली बाळासाहेब मदने | फिर्यादी | ५७ |
| २) | तुषार बाळासाहेब मदने | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ६१ |
| ३) | बाळासाहेब आप्पा मदने | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ६२ |
| ४) | सतीश लहानु मदने | घटनास्थळ पंच | ६४ |
| ५) | डॉ.पी.जी. सिंगल | वैद्यकीय अधिकारी | ६८ |
| ६) | विकास मधुकरराव जाधव | तपासी अधिकारी | ७६ |

## आरोपीतर्फे साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

## अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | ५८/सा.क्र. १ व ५ | दवाखान्याचे पत्र |
| २ | ५९/सा.क्र. १ | फिर्याद |
| ३ | ६५/सा.क्र. ४ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | ६९ ते ७१/सा.क्र. ५ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ५ | ७२/सा.क्र. ५ | पोलीसांनी वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिलेले पत्र |
| ६ | ७७/सा.क्र. ६ | घटनेचा प्राथमिक अहवाल |
| ७ | ७८ ते ८०/सा.क्र. ६ | कलम ४१–अ च्या नोटीस |
| ८ | ८१ व ८२/सा.क्र. ६ | कलम १७० च्या नोटीस |

**न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी**

| | | |
|---|---|---|
| १ | ८४ | फौ.प्र.सं. चे कलम ३१३ प्रमाणे आरोपींचे निवेदन |

**मुद्देमालाचा तपशील**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | एम.ओ. नं. १<br>जी.एम.पी. नं.३२/२०२५ | दगड |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (दिनांक १२/०५/२०२६)

आरोपी क्र.१ ते ६ यांचे विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ खालील शिक्षापात्र अपराधासाठी खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणे–**

२. फिर्यादी अ.सा.क्र.१ रुपाली बाळासाहेब मदने यांनी फिर्याद दिली की,

दिनांक ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वाजण्याचे सुमारास त्या त्यांच्या घरासमोर असतांना शेजारी राहणारे त्यांचे चुलत दीर आरोपी क्र. १ व त्यांची पत्नी आरोपी क्र. २ यांनी विनाकारण त्यांना शाब्दीक शिवीगाळ सुरु केली. त्यावर त्यांचे पती बाळासाहेब यांनी त्यांना, तुम्ही जुन्या वादाचे कारण काढुन विनाकारण भांडण काढु नका असे म्हटले. त्यावेळी तिथे असलेला आरोपी क्र. १ राजेंद्र हा तुम्हाला जास्त झाले आहे आता तुम्हाला दाखवतो, असे म्हणुन राजेंद्रने फिर्यादीला दगड फेकुन मारला व त्यामुळे त्यांच्या उजव्या गालावर जखम झाली. त्यावर त्यांनी आरडाओरडा केला असता त्यांचा मुलगा तुषार व पती बाळासाहेब हे त्यांना वाचवण्यासाठी आले. आरोपी राजेंद्र याने पुन्हा दगडाने त्यांना मारहाण केली. दगडाने त्यांच्या मुलास डोक्यात उजव्या डोळ्याच्या वरती जखम झाली. त्यानंतर आरोपी क्र. ३ ते ६ यांनी येऊन त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. १ राजेंद्र व आरोपी क्र. ५ शांतीलाल यांनी पुन्हा आमच्या नादी लागलात तर तुम्हा सगळ्यांना जिवे मारुन टाकु अशी धमकी दिली. त्यावेळी त्यांचे वस्तीवरील काही लोकांनी त्यांच्या भांडणाची सोडवासोडव केली. सबब प्रस्तुतची फिर्याद.

३. फिर्यादवरुन पोलीस ठाणे आष्टी येथे गु.र.क्र. ५२४/२०२३ नोंदविण्यात आला. प्रस्तुत गुन्हयाचा तपास, तपास अधिकारी व्ही.एम. जाधव, पोलिस ठाणे आष्टी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा करुन गुन्हयात वापरलेले हत्यार दगड जप्त केला, साक्षीदारांचे तपासटिपण नोंदवले, जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्रे व इतर कागदोपत्री पुरावा हस्तगत केला. तपासाअंती आरोपींविरुध्द गुन्हा निष्पन्न झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र/अंतीम अहवाल

दाखल केला.

**४.** आरोपी यांचेवर भारतीय दंड विधानाचे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये दोषारोप (निशाणी क्र.२४) निश्चित केला. आरोपींनी त्यांचे निवेदन (नि.क्र.२५ ते ३०) अन्वये गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**५.** आरोपी यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र. ८४ वर नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या शेतातुन पाट गेला आहे, त्यामध्ये त्यांचे शेत गेले आहे, त्याबाबत पैसे मागण्यासाठी आप्पासाहेब मदने यांच्याकडे गेल्यामुळे फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना मारहाण करुन खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता व आरोपी तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**७.** या सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष त्याखाली नमुद कारणांकरीता नोंदविले आहेत :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी सामुहिक उद्देशाचे पुर्तीसाठी गैरकायद्याची मंडळी जमविली व आरोपी त्या जमावाचे सदस्य होते ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन त्या मंडळीच्या | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | समान उद्दीष्टाने आरोपींनी फिर्यादीवर बलप्रयोग केला ? | |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास दगड यासारख्या प्राणघातक हत्याराने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली? | नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास जाणीवपुर्वक अपमानीत करुन शिवीगाळ केली व त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल हे माहित असुनही त्यास चिथावणी दिली ? | नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास जीवे मारण्याच्या धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | नाही. |
| ६. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **का र ण मि मां सा** ::

**मुद्दे क्र.१ ते ५ करीता** :

८. मुद्दा क्र.१ ते ५ एकमेकांशी संलग्न असलेने त्यांची कारणे एकत्र नोंदविण्यात येत आहेत. अभियोग पक्षाने आरोपींच्या विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता वर भाग 'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे ६ साक्षीदारांना तपासले आहे. तसेच कागदोपत्री पुराव्याकामी 'अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी' या उपरोक्त तपशिलात नमूद केलेली कागदपत्रे शाबित केलेली आहेत.

९. आरोपींच्या विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपी यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन त्या मंडळीच्या उद्देशपुर्तीसाठी फिर्यादी व साक्षीदारास दगडाने मारुन दुखापत केली हे सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच, त्यांनी फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे देखील अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे.

१०. अ.सा.क्र.१ रुपाली बाळासाहेब मदने (फिर्यादी) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, दिनांक ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास त्या घरासमोर असतांना घटना घडली. आरोपी क्र. १ व २ यांनी जुन्या भांडणाचे कारण काढुन शिवीगाळ केली. आरोपी क्र. १ याने त्यांच्या उजव्या गालावरती दगडाने मारले. त्यांनी आरडाओरडा केल्यानंतर त्यांचे पती बाळासाहेब व मुलगा तुषार तेथे आले. त्यांच्या पतीने आरोपी क्र. १ यास का मारले असे विचारले असता, आरोपी क्र. १ फिर्यादीच्या पतीस तुला जास्त झाले काय असे म्हणाला. आरोपी क्र. १ ने त्यानंतर मुलगा तुषार यास उजव्या डोळ्याच्या वर दगडाने मारले. आरोपी क्र. ३ ते ६ तेथे येऊन जबरदस्तीने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी क्र. १ व ६ यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर शेजारच्या लोकांनी त्यांच्या भांडणे सोडवली. त्यानंतर त्या कडा पोलीस स्टेशनला गेल्या. पोलीसांनी नि. ५८ प्रमाणे दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. त्यानंतर त्यांनी उपचार घेतल्यानंतर नि. ५९ प्रमाणे फिर्याद दिली. दुसऱ्या दिवशी पोलीस घरी आले. पोलीसांनी पंच सतीशष मदने, अशोक श्रीराम यांच्यासमक्ष पंचनामा केला. त्यांना आरोपींनी ज्या दगडाने मारले होते तो दगड/ मुद्देमाल त्यांनी न्यायालयासमक्ष

गुन्ह्यात वापरल्याचे सांगितले.

**११.** अ.सा.क्र.२ तुषार बाळासाहेब मदने (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, फिर्यादी त्यांची आई आहे. घटना दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० सुमारास घरासमोर असतांना घडली. आरोपी क्र. १ व २ त्यांच्या आईला जुन्या वादाच्या कारणावरुन शिवीगाळ करत होते. त्यांचे वडील बाळासाहेब आरोपींना शिवीगाळ का करता से म्हणाले असता, आरोपी क्र. १ ने त्यांच्या आईच्या गालावर दगड फेकुन मारला. त्यामुळे आईच्या उजव्या गालावर जखम झाली. त्यानंतर त्यांच्या आईने आरडाओरड केली. त्यांनी व त्यांच्या वडीलांनी भांडणे सोडवली. आरोपी क्र. १ ने त्यांच्या उजव्या डोळ्याचया वरती दगड फेकुन मारला. त्यामुळे त्यांना उजव्या डोळ्याच्या वर जखम झाली. त्यानंतर इतर आरोपी क्र. ३ ते ६ तेथे आले व त्यांनी त्यांना, त्यांच्या वडीलांना व आईला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वस्तीवरील लोकांनी भांडणे सोडवली. त्यानंतर ते पोलिस स्टेशनला गेले पोलीसांनी त्यांना दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. त्यांनी कडा सरकारी दवाखाना येथे उपचार घेतले त्यानंतर पुन्हा पोलीस स्टेशनला येऊन फिर्यादीने आरोपीविरुध्द फिर्याद दिली. आरोपींनी ज्या दगडाने मारहान केली तो एम.ओ.१ वरील एक दगड त्यांनी ओळखला.

**१२.** अ.सा.क्र.३ बाळासाहेब आप्पा मदने (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, फिर्यादी त्यांची पत्नी आहे. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र. १ ते ४

जुन्या वादाच्या कारणावरुन शिवीगाळ करत होते. ते आरोपींना शिवीगाळ का करता असे सांगायला गेले असता, आरोपी क्र. १ ते ६ यांनी शिवीगाळ केली व मारहाण केली. फिर्यादी रुपाली हिला आरोपी क्र. १ ने गालावर दगड मारला. मुलगा तुषार ह्याच्या डोळ्याच्या वरती दगड लागला. त्यानंतर ते कडा पोलीस स्टेशनला गेले. पोलीसांनी दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. सरकारी दवाखाना कडा येथे उपचार घेतले व पोलीस स्टेशनला येऊन फिर्यादीने फिर्याद दिली. दि. १०/१२/२०२३ रोजी पोलीस घटनास्थळी आले व पंचनामा केला. आरोपींनी ज्या दगडाने मारहान केली ती एम.ओ.१ वरील एक दगड त्यांनी ओळखला.

**१३.** अ.सा.क्र.४ सतीश लहानु मदने (घटनास्थळ पंच) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, दि. ०४/१२/२०२३ रोजी जाधव पोलीसांनी सकाळी ८ ते ९ वाजण्याच्या सुमारास शिराळ येथील हनुमंत गाव मदने वस्ती येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. सोबत दुसरे पंच अशोक श्रीराम हे होते. घटनास्थळ फिर्यादीने दाखवले. फिर्यादीने मारहाण झालेले ठिकाण दाखवले. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष मुद्देमाल दगड जप्त केला. नि. ६५ प्रमाणे त्यांच्यासमक्ष पंचनामा केला.

**१४.** अ.सा.क्र.५ डॉ.पी.जी. सिंगल (वैद्यकीय अधिकारी) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, दिनांक ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ८.४० वाजण्याच्या दरम्यान फिर्यादी रुपाली, तुषार व बाळासाहेब हे पोलीस मेमोसह त्यांच्याकडे आले होते. अ.सा.क्र.१ रुपाली याच्या अंगावर नि.६९ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमुद जखम आढळुन आली. सदरील जखम साध्या स्वरुपाची होती.

सदरील जखम कठीण वस्तुने मारल्यास होवु शकते. त्याबाबत त्यांनी नि.६९ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र दिले. अ.सा.क्र. २ तुषार याच्या अंगावर नि.७० वरील वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमुद जखमा आढळुन आल्या. सदरील जखमा साध्या स्वरुपाच्या, कठीण व बोथट हत्याराने झालेल्या ताज्या जखमा होत्या. त्याबाबत त्यांनी नि.७० वरील वैद्यकीय प्रमाणपत्र दिले. अ.सा.क्र. ३ बाळासाहेब याच्या अंगावर नि.७१ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमुद जखमा आढळुन आल्या. सदरील जखमा साध्या स्वरुपाच्या, कठीण व बोथट हत्याराने झालेल्या ताज्या जखमा होत्या. त्याबाबत त्यांनी नि.७१ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र दिले.

**१५.** अ.सा.क्र.६ विकास मधुकरराव जाधव (तपासी अधिकारी) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, त्यांच्याकडे तपास आल्यानंतर नि.६५ वरील घटनास्थळ पंचनामा केला. त्यानंतर घटनास्थळावरुन त्यांनी गुन्ह्यात वापरलेला दगड जप्त केला. घटनेसंबंधी साक्षीदारांचे त्यांच्या सांगणेप्रमाणे जबाब नोंदवले. त्यानंतर आरोपींना नि. ७८ ते ८० प्रमाणे फौ.प्र.सं. कलम ४१ अ ची नोटीस दिली. गुन्ह्यातील जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यानंतर आरोपींना नि. ८१ व ८२ प्रमाणे कलम १७० प्रमाणे नोटीस दिली. आरोपींच्या विरुध्द गुन्हा निष्पन्न झाल्याने दोषारोप पत्र दाखल केले.

**१६.** अभियोगपक्षाने युक्तीवाद केला की, अ.सा.क्र.१ ते ६ यांच्या पुराव्यावरुन आरोपींनी गुन्हा केल्याचे सिध्द होते. अ.सा.क्र.१ च्या पुराव्यात फिर्याद सिध्द झाली आहे. इतर साक्षीदारांचा पुरावा फिर्यादीस पुरक असुन त्यामुळे

आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होतो. सबब आरोपींना दोषी ठरवुन शिक्षा करण्याची विनंती केली आहे. याउलट, आरोपीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये अनेक विसंगती असुन आरोपींवरील गुन्हा संशयापलीकडे सिध्द केलेला नाही. अभियोग पक्षाने गुन्हा शाबीत करण्यासाठी स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. सबब, आरोपींविरुध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यास अभियोगपक्षास यश आलेले नाही. त्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात यावी.

**१७.** अभिलेखाचे अवलोकन केले, दोन्ही पक्षाचा युक्तीवाद विचारात घेतला. आरोपींनी त्यांचे नि. ८४ वरील फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे नोंदवलेल्या निवेदनामध्ये त्यांच्या शेतातुन पाट गेला आहे, त्यामध्ये त्यांचे शेत गेले आहे, त्याबाबत पैसे मागण्यासाठी आप्पासाहेब मदने यांच्याकडे गेल्यामुळे फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना मारहाण केली तसेच जुन्या वादातुन खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे. सदर बचाव त्यांनी सिध्द केला किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात अ.सा.क्र.१ यांनी मान्य केले आहे की, आरोपीसोबत पाटाच्या मोबदल्याच्या पैशावरुन त्यांच्यामध्ये वाद होतात. आरोपी सोबत ९ वर्षापासुन वाद आहेत. तसेच आरोपीवर त्यांचा राग आहे. घटनेच्यावेळेस सासरे दुसऱ्याच्या अंगणात होते. तसेच सा.क्र. २ व ३ झोपलेले होते. आरोपींनी त्यांच्यावर खटला क्र. २४५/२०२४ केल्याचे अमान्य केले. तसेच त्यांनी आरोपींना मारहाण केल्याचे देखील अमान्य केले. येथे नमुद करावेसे वाटते की, खटला क्र. २४५/२०२४ हा आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या

कुटुंबीयांवर दाखल केला आहे. परंतु सदर बाब त्यांनी उलटतपासात नाकारली. त्यामुळे साक्षीदार सत्य घटना लपवत असुन त्यांच्या इतर पुराव्यावर संशय निर्माण होतो.

**१८.** अ.सा.क्र.२ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, आरोपीसोबत त्यांचे दीड वर्षापासुन वाद आहेत. तसेच औरंगाबादला चालु असणाऱ्या केसकामी आजोबा आप्पासाहेब मदने आरोपी क्र. १ सोबत गेल्याचे त्यांच्या सा.क्र. ३ वडीलांना पटले नाही. परंतु सा.क्र. ३ बाळासाहेब यांनी त्यांच्या उलटतपासात आप्पा मदने यांना आरोपी क्र. १ ने गाडीमध्ये नेल्याचे अमान्य केले. तसेच त्यांनी आरोपीसोबत १६ वर्षापासुन वाद असल्याचे सांगितले. सा. क्र. १ ते ३ यांच्या पुराव्यात विसंगती दिसुन येते. तसेच आरोपींनी घेतलेला बचाव विचारात घेता, सदर साक्षीदारांनी जुन्या वादातुन आरोपीविरुध्द खोटी केस केल्याचे नाकारता येत नाही.

**१९.** अ.सा.क्र.४ सतीश यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, फिर्यादीचे पती त्यांचे पुर्वीपासुन ओळखीचे आहेत. तसेच आरोपी व फिर्यादीचे घर पुर्वीपासुन माहिती आहे. सदर साक्षीदार स्वतंत्र साक्षीदार नसल्यामुळे घटनास्थळ पंचनाम्यावर संशय निर्माण होतो. अ.सा.क्र.५ वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, सा.क्र. २ तुषार मदने यास पोलीस मेमो दिलेला नव्हता. परंतु सा.क्र. २ तुषार याने त्यास पोलीसांनी दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिल्याचे सांगितले. दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यात विसंगती दिसुन येते. तसेच फिर्यादीने उलटतपासात सा.क्र. २ व ३ घटनेच्या वेळी झोपलेले

असल्याचे सांगितले त्यामुळे सा.क्र. २ व ३ हे घटना प्रत्यक्ष पाहिलेबाबत संशय निर्माण होतो.

**२०.** अ.सा.क्र.६ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, सर्व साक्षीदार नातेवाईक असुन त्यांनी फिर्यादीच्या शेजारील लोकांचे जबाब नोंदवले नाही. तसेच दि. ०३/१२/२०२३ रोजी फिर्यादीने आरोपींना मारहाण केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे त्यांनी मान्य केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता, आरोपींनी देखील फिर्यादीवर केस केल्याचे दिसुन येते व तपासी अधिकाऱ्याने सदर घटना तपासात निष्पन्न झाल्याचे सांगितले आहे. घटनेला कोणताही स्वतंत्र साक्षीदार नसल्याने घटना संशयापलिकडे सिध्द होत नाही.

**२१.** अभियोग पक्षाचा पुरावा पाहता आरोपी वरील दोषारोप संशयापलीकडे सिध्द होणे गरजेचे आहे. आरोपींनी त्यांचे फौ.प्र.सं. कलम ३१३ चे जबाबात त्यांच्या शेतातुन पाट गेला आहे, त्यामध्ये त्यांचे शेत गेले आहे, त्याबाबत पैसे मागण्यासाठी आप्पासाहेब मदने यांच्याकडे गेल्यामुळे त्यांना मारहाण केली व सबब फिर्यादीने त्यांच्या विरुध्द खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे. अ.सा.क्र. ०१ फिर्यादीच्या उलटतपासात तिने पाटाच्या पैशावरुन भांडणे होत असल्याचे मान्य केले आहे. सदर बाब लक्षात घेता, आरोपीचा बचाव संयुक्तीक वाटतो. तसेच सा.क्र. १ ते ४ हे नातेवाईक असुन आरोपींनी त्यांच्या पुराव्यावर संशय निर्माण केला आहे. फिर्यादीने जुन्या वादातुन तसेच आरोपींनी त्यांच्यावर केलेल्या केस रागातुन आरोपींवर सदरची केस केल्याचे नाकारता येत नाही. केवळ सा.क्र. ५ व ६ यांच्या पुराव्यातुन

आरोपीविरुध्द गुन्हा संशयापलिकडे सिध्द होत नाही. वर नमुद केल्याप्रमाणे, अभियोगपक्षाच्या पुराव्यावर संशय निर्माण होत असल्याने संशयाचा फायदा आरोपीस देणे पात्र ठरते.

**२२.** प्राप्त परिस्थितीत उपलब्ध पुराव्याचे एकंदर अवलोकन केले असता आरोपींविरुध्द गुन्हयामध्ये गोवण्याइतपत कुठलीही बाब न्यायालयासमोर आलेली नाही. अपु–या पुराव्यामुळे, आरोपी यांनी सामुहिक उद्देशाचे पुर्तीसाठी गैरकायदयाची मंडळी जमविली, त्या मंडळीच्या समान उद्दीष्टाने आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना दगडाने मारुन दुखापत केली. तसेच, त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली, हे संशयापलीकडे सिध्द होत नाही. अभियोगपक्षाला भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ चे आवश्यक घटक सिध्द करण्यात पुर्णपणे अपयश आल्याचे दिसुन येते. सबब, मुद्दा क्रं.१ ते ५ चे निष्कर्ष “नकारार्थी“ नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्र.६ साठी</u>:–**

**२३.** मुद्दे क्र. १ ते ५ चा निष्कर्ष पाहता, अभियोगपक्ष आरोपी क्र.१ ते ६ यांचेविरुध्द आरोप शाबीत करण्यास अपयशी ठरले आहेत. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. आरोपी क्र. ३ व ४ गैरहजर आहेत. आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र असल्याने न्यायनिर्णय त्यांच्या गैरहजेरीत देण्यात येतो. सदर प्रकरणातील एम.आर.नं.४६/२०२४, जी.एम.पी. नं.३२/२०२५ मधील जप्त मुददेमाल एक दगड हा मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर त्यांची

नियमानुसार विल्हेवाट लावणे न्यायोचित होईल. करीता, मुद्दा क्र.६ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत :-

:: **आदेश** ::

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ ते ६ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३, १४७, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे प्रत्येकी रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व एक जामीनदार दयावा. |
| ४. | एम.ओ.नं. १/ जी.एम.पी. नं.३२/२०२५ मधील जप्त मुददेमाल दगड हा अपील कालावधी संपल्यानंतर त्यांची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर) |

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.05.12 17:51:17 +0530

ठिकाण - आष्टी
दिनांक - १२/०५/२०२६

( महेश आर. बडाख )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), आष्टी

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : 12/05/2026
Transcribed on : 12/05/2026
Checked & signed on : 12/05/2026

**Sd/-**
Rahul S. Abnave,
(Jr. Clerk)